**Education and Society**
(शिक्षण आणि समाज)

**Special Issue**
UGC CARE Listed Journal
ISSN 2278-6864

# Education and Society

**Since 1977**

**The Quarterly dedicated to Education through Social Development**
**And Social Development through Education**

Special Issue on the theme of
**"Socio-Economic Status of SC/ST In India and Human Recourse Development"**

**May 2023**

**(Special Issue-1I/ Volume-III)**

**Indian Institute of Education**
**J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38**

# Indian Institute of Education

## Education and Society

Special Issue on the theme of **"Socio-Economic Status of SC/ST In India and Human Recourse Development"** (National Seminar organized by Vivekanand College, Kolhapur sponserd by ICSSR New Delhi dated 12, 13 May 2023 )

## Prof. J. P. Naik and Dr. Chitra Naik

Founder of the Institute

### Editorial Board:

Prin. (Dr.) Jayasing Kalake, Chief Editor
Dr. Prakash B. Salavi, Executive Editor
Mrs. Shailaja D. Sawant, Secretary

**Guest Editors:**
Dr. Govardhan Ubale
Dr. Shubhangi Kale

**Publisher:**
Indian Institute of Education
J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38

**Contact Numbers:** 8805159904, 9834109804
**Web-site:** www.iiepune.org
**Email:** educationandsociety1977@gmail.com, iiepune1948@gmail.com

---

Education and Society, the educational quarterly is owned, printed and published by the Indian Institute of Education, Pune. It is printed at Pratima Mudran, 1-B, Devgiri Istate, Survey No. 17/1-B, Plot no. 14, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune 38. It is published by the Editor Dr. Jaysing Kalake at Indian Institute of Education J. P. Naik Path, Kothrud, Pune- 38. Opinons or views or satatements and conclusions expressed in the articles that are published in this issue are personal of respective authors. The editor, editorial board and the institution will not be responsible for the same in any way.

# Education and Society

## Content…

**1. कोल्हापूर जिल्हा पन्हाळा तालुक्यातील सामाजिक व आर्थिक विकास आणि स्त्री पुरुष लिंग गुणोत्तराच्या संहसंबंधाचा तुलनात्मक अभ्यास (२०११)**
Ms. Ashwini Muravane, Dr. Omprakash Shapurkar and Dr. Sunil Bhosale **009**

**2. आदिवासी समुदायाच्या समस्या- एक समाजशास्त्रीय अभ्यास**
Mr. Harishchandra Chame **017**

**3. रहिमतपूर शहरातील अनुसूचित जातींच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास**
Mr. Shivaji Sampat Chavan and Dr. Arun Patil **022**

**4. कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील मेघोली व वासनोली वाडा या आदिवासी वाडयांचा सामाजिक आर्थिक जीवनाचा भौगोललकदृष्ट्या अभ्यास**
Mr. Sanjaykumar Menshi **031**

**5. दलित जीवन का दर्दनाक यथार्थ : छप्पर**
Dr. Dipak R. Tupe **039**

**6. Understanding The Tribal Population of Goa: A Socio- Demographic Overview**
Dr. Harpreet Singh **045**

**7. Role of Traditional Knowledge and Folk Culture of Missing Tribe of Assam in Sustaining Environment: A Deep Ecology Perspective**
Ms. Saikia Dhritisha, Mr. Prasad Riteish, Miss Aishwarya Hingmire and Mr. Mayur Goud **055**

**8. Unveiling the Voices of Resilience: Major Dalit Women Writers**
Dr. Shruti Joshi **064**

**9. Educational Attainment for Sustainable Livelihood: Challenges before Marginalized Society of Sugarcane-Cutters in Maharashtra (India)**
Dr. Shubhangi Kale and Dr. Sambhaji Shinde **072**

# आदिवासी समुदायाच्या समस्या: एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

विवेकानंद (स्वायत्त) महाविद्यालय.कोल्हापूर

---

**प्रस्तावना:**

भारतीय संविधानात आदिवासीना अनुसूचित जनजाती असे संबोधले आहे. आदिवासी हे मूळचे भारतीय रहिवासी आहेत .भारतीय समाजाचे प्रामुख्याने तीन विभागात विभाजन केले जाते. एक नागरी समुदाय दोन ग्रामीण समुदाय आणि तिसरे आदिवासी समुदाय या तिन्ही समुदायाच्या संस्कृतीमध्ये खूप अंतर आहे. या सांस्कृतिक वेगळेपणामुळे या तिन्ही समुदायाला एक वेगळ अस्तित्व प्राप्त झाले आहे.या तिन्ही समुदायात खूप वेगळेपणा आहे. लोक लोकांची वस्ती, वस्तीचा आकार, लोकांतील सामाजिक संबंध, लोकांचे राहणीमान, जीवनशैली, खानपान याविषयी खूप मोठ्या प्रमाणात विविधता दिसून येते.जंगल, दऱ्या, खोऱ्यात, वास्तव्य करणाऱ्या जगाच्या प्रगती पासून कोसो दूर असलेला समाज म्हणजे आदिवासी समाज होय. आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश म्हणून ओळखला जातो.2011च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी 8.6% आहे. एकूण लोकसंख्येच्या म्हणजे 10 करोड लोकसंख्या आदिवासीची आहे. 2011 च्या जनगणनेनुसार देशाच्या एकूण आदिवासी लोकसंख्येच्या 5.1% लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या 8.87 % म्हणजे महाराष्ट्रात आदिवासींची संख्या 1 कोटी 5 लाख एवढी आहे. मोठ्या प्रमाणामध्ये धुळे नंदुरबार जळगाव ठाणे, चंद्रपूर गडचिरोली, यवतमाळ भंडारा, गोंदिया ,नागपूर, अमरावती या जिल्ह्यात आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. आदिवासी समुदायाच्या समस्या जाणून घेणे.
2. आदिवासींच्या समस्या वर उपाययोजना सुचविणे.
3. आदिवासी विकासातील अडथळे जाणून घेणे.
4. आदिवासी समुदायाची जीवन पद्धती जाणून घेणे.

**संशोधनाचे गृहीतके:**

1.आदिवासी समुदायात शिक्षणाचा अभाव आहे.
2. आदिवासी समुदायात अभौतिक संस्कृतीला महत्त्व दिले जाते.
3. आदिवासी मागास पद्धतीने शेती करतात
4. आदिवासी समुदायात अंधश्रद्धा खूप मोठ्या प्रमाणात आहे.

**संशोधन पद्धत:**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय तथ्य संकलनाचा वापर करण्यात येणार असून .यामध्ये प्रामुख्याने इंटरनेट, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे. आदिवासी समाजाच्या समस्या आदिवासी समाज हा जंगलात वास्तव्य करणारा असल्याने त्यांचा प्रगत समाजाशी संपर्क नसतो. त्यामुळे त्याचा विकास झाला नाही. शिक्षणाचा अभाव असल्याने त्यांची प्रगती झाली नाही .

**आदिवासी समाजाच्या समस्या:**

**अज्ञान:**

आदिवासी लोक जंगल दऱ्या खोऱ्यात वास्तव्य करतात. तिथे त्यांना शाळेची व्यवस्था नसते. आणि ज्या भागात शाळा आहेत तिथे शिक्षक उपलब्ध नसतात. अनेक मुलं आपल्या आई वडिलां सोबत शिकार, मासेमारी, फळ ,कंदमुळे जमा करतात, त्यातच त्यांचा दिवस जात असतो. त्यामुळे ते शाळेत जात नाहीत ,त्यामुळे आदिवासी लोकात अज्ञान खूप मोठ्या प्रमाणात आहे .शिक्षणाचा अभाव असल्यामुळे त्यांना अनेक समस्यांना समोर जावे लागते शासन प्रयत्न करत आहे पण म्हणावं तशा पद्धतीने शासनाला प्रतिसाद मिळत नाही,रस्ते नसल्याने शिक्षण त्याच्या देणे अवघड झाले आहे. दारिद्र्य, अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभूत गरजांची पूर्तता न होणे म्हणजे दारिद्र्य होय. आदिवासी समुदाय हा खूप मागास समाज आहे. त्यांच्या दैनंदिन जीवन जगण्याच्या पद्धतीत ते परिवर्तन करण्यास तयार नसतात. फळ, कंदमुळे, शिकार, पारंपारिक शेती, शिक्षणाचा अभाव यासारख्या कारणामुळे त्यांच्या विकास खुंटला आहे .ते पशुवंत जीवन जगतात त्याना इतर  कोणताही उद्योग व्यवसाय नसतो. जेथे काम करतात ते आपल्या उदरनिर्वासाठी  करत असतात. संपत्तीचा संचय करत नाहीत. त्यामुळे ते दारिद्र्यात जीवन जगताना दिसतात. झूम शेती मुळे त्यांची शेतीतील उत्पन्न खूपच कमी असते. जंगल विषयक कायद्याने त्यांच्या उदनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे .अशा प्रकारे दारिद्र्याची समस्या आदिवासी समुदायात दिसते.

**कर्जबाजारीपणा:**

आदिवासींना जंगलचा राजा मानले जाते, त्याना परंपरागत जंगलावरील हक्कापासून वंचित करण्यात आले आहे. जंगले खाणी ठेकेदाराकडे गेली आणि आपल्या भूमीतच आदिवासी उपरे झाले .आणि ठेकेदार सावकारांनी आदिवासींच्या पिढ्यानपिढ्या कर्जातच राहतील अशी व्यवस्था करून ठेवली. अज्ञान, अंधश्रद्धा याचा फायदा आदिवासीची समुदायातील लोकांचा सुशिक्षित लोकांनी घेतला व त्यांना आकडे मोड हिशोब करता येत नसल्याने त्यांची फसवणूक करण्यात येते. त्यामुळे त्यांना कर्ज परतफेड करण्यात आपल्या आयुष्य घालावे लागते. दिवसेंदिवस जंगल कमी होत आहे. त्यामुळे आदिवासींच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे त्यासाठी ते कर्जाच्या ओझ्याखाली  दाबले जातात व त्यातून आदिवासी लोक कर्जबाजारी बनतात.

**व्यसनाधीनता:**

आदिवासी लोक जंगल दऱ्या-खोऱ्यात वास्तव्य करत असले तरी त्यांच्यात  दारूचे व्यसन खूप मोठ्या प्रमाणात आहे .होळी सारख्या , सण, उत्सवात  पुरुषा सोबत महिलाही मोठ्या प्रमाणात दारू पित असतात .जी दारू असते ती कोणत्याही शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून तपासली जात नाही .ती दारू  पारंपारिक पद्धतीने तयार केली जाते आणि ती पिल्याने अनेकांना आपल्या जीव गमावा लागला आहे एक तर दवाखान्याकडे जाण्याचा आदिवासीचा कल कमीच असतो .व्यसनाधीनतेने आजारी पडलेला व्यक्ती योग्य उपचारा अभावी आपल्या आयुष्य संपवतो ही व्यसनाधीनता दिवसेंदिवस आदिवासींमध्ये वाढत आहे त्यामुळे त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

**जंगल तोड:**

जंगल हे आदिवासींच्या उदरनिर्वाचे महत्त्वपूर्ण साधन होते.  मोठ्या प्रमाणामध्ये जंगल तोड होत आहे .आणि  राजकीय लोकांच्या वशील्याचा आधार असल्यामुळे  छुप्या पद्धतीने चोरीच्या मार्गाने जंगल खूप मोठ्या प्रमाणात तोडले जात आहेत. त्यामुळे आदिवासी ज्या जंगलात वास्तव्य करत होते, ज्या जंगलाच्या माध्यमातून त्यांच्या उदरनिर्वाचा प्रश्न सुटत होता, त्यांना जीवन जगण्याचे महत्त्वाचे साधन जे जंगल होते .त्यात कुठेतरी कमी होत

असताना दिसत आहेत, त्यामुळे जंगलतोड कायद्या जरी असला तरी त्याची अंमलबजावणी ज्या पद्धतीने होणे आवश्यक आहे. त्या पद्धतीने होत नाही .त्यामुळे आरक्षित केलेले जंगलही खूप मोठ्या प्रमाणामध्ये तोडले जात आहेत. त्यामुळे आदिवासींच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यांच्या सर्व गरजा जंगलाच्या माध्यमातूनच पूर्ण होतात. पण जंगलच  नाहीसे होत आहेत. त्यामुळे आदिवासी समोर उदरनिर्वाहाचा प्रश्न खूप मोठ्या प्रमाणामध्ये उभा राहिलेला दिसून येतो.

**कुपोषण:**

आदिवासी लोक उदरनिर्वाहसाठी सातत्याने भटकंती करत असतात. त्यामुळे त्यांच्या मुलाकडे त्यांना म्हणावं तेवढं लक्ष देता येत नाही .मुलांच्या खाण्याकडे लक्ष देऊ शकत नाहीत. मजुरीसाठी बाहेरगावी जावे लागते. वाहनांची सोई सुविधा नसल्याने मुलांना सोबत घेऊन जाता येत नाही .अशा प्रसंगी मुलं घरी राहतात त्यामुळे त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणे अशक्य होते. त्यांच्या शारीरिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या कॅलरीज ते मुलांना देऊ शकत नाहीत. तसेच अज्ञानामुळे मुलांच्या शारीरिक वाढ योग्य पद्धतीने होण्यासाठी मुलांना कोणता आहार दिला पाहिजे. याची माहिती नसते त्यामुळे पण मुलं कुपोषित होतात .

आदिवासी समुदायात कुपोषणामुळे  मोठ्या प्रमाणात मुलं मृत्यूमुखी पडत असतात त्यामुळे कुपोषण एक मोठी समस्या आदिवासी समुदायांमध्ये आहे.

**आरोग्य विषयक समस्या:**

आदिवासी समुदाय हा प्रगत समाजापासून दूर असल्याने त्यांना चांगल्या आरोग्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे हे माहित नाही. अस्वच्छ राहणीमान, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा अभाव यामुळे कावीळ, नारू, कॉलरा, तसेच संसर्जन्य आजारांना आदिवासी लोक सातत्याने बळी पडत असतात. आदिवासी समाजात डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या अपुरी आरोग्य केंद्र तसेच आदिवासी समुदायात असणारी अंधश्रद्धा यामुळे लोक आपल्या आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याऐवजी जादूटोणा, कर्मकांड यात अडकतात. त्यामुळे त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते व अनेक लोक आजाराला बळी पडतात. शरीराची योग्य काळजी घेत नाहीत रोज आंघोळ करत नाहीत कमी कपडे अस्वच्छता यामुळे सातत्याने त्यांना आजाराचा सामना करावा लागतो.आदिवासी भागात रस्ता नसल्याने त्यांच्यापर्यंत शासनाच्या आरोग्य सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे आरोग्य विषयक समस्या ही दिवसेंदिवस वाढत  आहेत.

**स्त्रियांचे लैंगिक शोषण:**

आदिवासी लोक जंगलाचा रहात असल्याने आपल्या जंगलाच्या आजूबाजूला जी गावे आहेत तसेच शहरे आहेत अशा ठिकाणी रोजगाराच्या निमित्ताने जातात एक तर अज्ञानी असल्यामुळे त्यांना हिशोब जमत नाही. आकडे मोड जमत नाही. त्यामुळे त्यांना योग्य मोबदला दिला जात नाही. तसेच आदिवासी महिलांना ठेकेदार लोक वेगवेगळी प्रलोभनी दाखवून त्याचे शारीरिक शोषण करतात तरुण वयातील मुलींना पैशाचा आम्हीच दाखवून वेश्याव्यवसायाकडे  लोटलं जातं. त्यांचे आयुष्य बरबाद केलं जातं. महिलाकडून काम करून घेतलं जातं पण त्यांना योग्य मोबाईल ला दिला जात नाही .त्यांचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण केले जाते .आदिवासी समाजातील मुली मोठ्या प्रमाणात बेपत्ता होत आहेत. त्याच्या वडिलांना पैशाचा आमिष  दाखवून मुलींना शहरी भागात वेश्या व्यवसाय करण्यासाठी घेऊन जातात अशा प्रमाणे मोठ्या प्रमाणामध्ये आदिवासी महिलांचे शोषण होत आहे.

**प्रथा परंपरा व अंधश्रद्धा:**

आदिवासी लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव खूप मोठ्या प्रमाणामध्ये आहे .आदिवासी लोकप्रथा,परंपरा, अंधश्रद्धा यावर विशेष भर देतात." जुने ते सोनं" ही मानसिकता त्यांची असते अनेक वाईट प्रथा आदिवासींच्या आहेत पण त्यांना त्या आपल्या समाजाचा अभिमान आहे असे वाटते सन उत्सवाच्या माध्यमातून व्यसनाधीनता, नाविन्याचा अभाव, पारंपारिक मानसिकतेमुळे नवीन काही करावे अशी त्यांची धरणा नसते. परंपरेच्या नावाखाली ते आपल्या शारीरिक आरोग्यविषयक नुकसान करून घेतात. आदिवासी लोक शिक्षणाचा अभाव असल्याने त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे अंधश्रद्धेला खूप महत्त्व देतात, काळी जादू पांढरी जादू, अशा प्रकारच्या जादू विषयक अंधश्रद्धा, आदिवासी मध्ये आहेत. एखाद्या आजाररी व्यक्तीने उपचारासाठी डॉक्टरांचा सल्ला घेतला पाहिजे पण तसे न करता मांत्रिकाकडे जातात .त्यामुळे त्यांच्यावर योग्य उपचार होत नाहीत त्यातून त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत असतो. आजारी एक आणि उपचार दुसरा अशा प्रकारची अवस्था आदिवासी लोकांची असते. आणि या अंधश्रद्धेमुळे आदिवासींचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. प्रथा परंपरा मध्ये अडकल्यामुळे त्यांच्या विकासास मारक ठरत आहेत.

**संस्कृतीचा ऱ्हास:**

आज मोठ्या प्रमाणावर जंगल कमी होत आहेत त्यामुळे आदिवासी लोक शहराच्या संपर्कात येऊ लागले आहेत. त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे .जे लोक शिक्षण घेतले शहरात स्थायी झाले ते शहरी संस्कृती आत्मसात करून ती संस्कृती आदिवासी समाजात रुजवत आहेत. त्यामुळे जे वैभवशाली आदिवासी लोकांची संस्कृती होती ती दिवसेंदिवस लयास चाललेली आहे. आदिवासी समुदायात ज्या प्रथा परंपरा सण उत्सव वेगवेगळे महोत्सव साजरी केले जात होते. ते प्रगत लोकांच्या संपर्कात मुळे त्यात बदल होत असताना दिसत आहेत. त्यामुळे आदिवासी समाजाच्या संस्कृतीचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

**वाढता भ्रष्टाचार:**

आदिवासी लोक अज्ञानी असल्यामुळे त्यांचा विकास झाला नाही त्यामुळे आदिवासी लोकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावे त्यांना प्रगतीच्या प्रवाहात आणता यावे यासाठी खूप मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे. आदिवासी भागात शाळा, वस्तीगृह, शिष्यवृत्ती यासारख्या योजना च्या माध्यमातून तसेच त्यांना पक्की घरी ,शेतीसाठी लागणारे अवजारे 100% सबसिडीच्या माध्यमातून देण्यात येत आहेत .जेणेकरून आदिवासी लोक आधुनिक पद्धतीने शेती करतील त्याची उत्पन्न वाढेल हा या मागचा हेतू आहे पण ज्याच्यासाठी योजना आहेत त्यांच्यापर्यंत त्या पोहोचतच नाहीत त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन योजना कागदावरच दाखविल्या जातात एखादी योजना दिली तर आदिवासी कडून पैसे काढले जातात अशा प्रकारचा भ्रष्टाचार खूप मोठ्या प्रमाणे आदिवासी समाजामध्ये वाढलेला दिसून येतो त्यामुळे आदिवासी साठी ज्या काही योजना आहेत. त्या आदिवासी मधील सुशिक्षित आणि श्रीमंत लोकांनीच त्या योजनांचा फायदा घेतला आहे. सर्वसामान्य अप्रगत मागास आदिवासींची जी प्रगती होण्यासाठी योजना तयार केल्या गेल्या त्या योजना खऱ्या गरजू लोकांपर्यंत पोहोचताना दिसत नाहीत. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जातो त्यामुळे आदिवासी लोक आजची प्रगती किंवा विकास या भ्रष्टाचारामुळे थांबला आहे.

**समस्यावर उपाय योजना:**

1) आदिवासी लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

2) आदिवासींमध्ये आरोग्य जनजागृती करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

3) जंगल विषयक कायदे कठोर करणे गरजेचे आहे जेणेकरून जंगल सुरक्षित राहतील

4) आदिवासीसाठी ज्या योजना तयार करण्यात आलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी व्यवस्थित करण्यावर भर दिला पाहिजे जेणेकरून भ्रष्टाचार कमी होईल.

5) आदिवासींचा जंगलावरील हक्क किंवा अधिकार अबाधित राहिले पाहिजेत.

6) आदिवासी अज्ञानी लोकांची फसवणूक करणाऱ्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे.

7) आदिवासी मुलातील कुपोषण कमी करण्यासाठी त्यांच्यापर्यंत पोष्टिक आहाराची पोहोचता केली पाहिजे. त्यासाठी त्यांच्यामध्ये आहार विषयक जनजागृती करणे आवश्यक आहे.

8) आदिवासीच्या संस्कृतीचे शासना मार्फत संचयन व संवर्धन करण्यावर भर दिला पाहिजे.

9) मागास आदिवासींना जंगलाच्या बाहेर येऊन एखादा व्यवसाय उद्योग करण्यासाठी त्यांना बँक पतसंस्थेच्या माध्यमातून विनातारण कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे.

**निष्कर्ष:**

1. शिक्षणाचा अभाव हे आदिवासी समुदायातील सर्वात मोठी समस्या आहे .
2. वाढत्या व्यसनाधीनतेमुळे आदिवासी लोकांच्या आरोग्यावर व प्रगतीवर परिणाम झाला आहे.
3. भ्रष्टाचार आदिवासी विकासामधील सर्वात मोठा अडथळा आहे .
4. कुपोषणाचं प्रमाण आदिवासीत खूप मोठ्या प्रमाणामध्ये असल्याचे दिसते.
5. अंधश्रद्धा कर्मकांड यामध्ये आदिवासी लोक मोठ्या प्रमाणात गुंतले आहेत.
6. आदिवासींची वैभवशाली संस्कृती प्रगत लोकांच्या संपर्कात आल्यामुळे त्याच्या वैभवशाली संस्कृतीचा ऱ्हास होत आहे .
7. अज्ञानामुळे ते आपल्या आरोग्याकडे लक्ष देत नाहीत.
8. आदिवासीच्या अज्ञानाचा फायदा घेऊन स्त्रियांचे लैंगिक शोषण खूप मोठ्या प्रमाणात केले जाते.
9. आदिवासी मधील अज्ञान अंधश्रद्धेमुळे आदिवासी मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणामध्ये आहे
10. अज्ञाना मुळे कर्जबाजारीला प्रोत्साहन मिळत आहे.

आदिवासी समुदाय हा जंगल दऱ्या खोऱ्यामध्ये वास्तव्य करणारा, शिक्षणाचा अभाव असणारा, व्यसनाधीनतेच्या आहारी गेलेला, अज्ञान, अंधश्रद्धा असलेला अप्रगत, मागास, समाज ज्या समाजात प्रथा परंपरा या खूप महत्वाच्या मानल्या जातात.आदिवासी समाजात कुपोषणमुळे बळी पडणाऱ्या मुलांची संख्या जास्त आहे.

**संदर्भ सूची:**

1) गारे गोविंद -1993 भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन औरंगाबाद.

2) साळुंखे संजय -आदिवासी समाजशास्त्र कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.

3) सुधाकर दाते -भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद

4) प्रदीप आगलावे- संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र विद्या प्रकाशन नांदेड

5) गोविंद गोरे -आदिवासीचे प्रश्न आदिम प्रकाशन पुणे .1975

6) संपूर्ण समाज कल्याण अधिकारी के सागर पब्लिकेशन पुणे 2012.

7) विलास सांगवी- आदिवासी सामाजिक जीवन पापुलर प्रकाशन मुंबई 1978

8) www. Tribal problems.in